दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परवाना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०३३/२०१७-१८
दि.२०/०३/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परवाना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.राजु दामोदर शेवंते, ...............अपिलार्थी
१०१, शेवंते निवास, गोडदेव गाव,
पो.खारीगाव, भाईंदर (पूर्व),
ता.जि.ठाणे ४०११०५.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
सहा.आयुक्त (परवाना)

Laxman B-M-
23-3-18

## -: विवेचन :-

श्री.राजु दामोदर शेवंते यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (परवाना) यांचेकडे दि.०६/०२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) भाईंदर (पूर्व) गोडदेव, इंद्रलोक येथील इलेक्ट्रीक टॉवर रोडवरील स्पोटर्स कॉम्प्लेक्स लगत एकाच बाजूला लागुनच दुसरा स्टॉल कोणत्या नियमानुसार कोणास दिलेले आहेत. त्या संबंधीची सर्व कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रती मिळाव्यात.

२) परवान्याचे नुतनीकरण केव्हा करण्यात आले? परवाना कोणत्या व्यवसायाकरिता देण्यात आला. दोन्ही स्टॉल एकमेकांच्या लगत देण्याबाबत शासनाचे महानगरपालिकेचे धोरण, ठराव व जी.आर. कागदपत्रांच्या छायांकित प्रती मिळाव्यात. दोन्ही स्टॉल संबंधित सर्व कागदपत्रे मिळावीत.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत अपुर्ण, दिशाभुल करणारी व चुकीची तसेच असमाधानकारक माहिती दिली असल्याने अपिलार्थी यांनी दि.२२/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परवाना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (परवाना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.२० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.परवाना/२३६/२०१८ दि.२८/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परवाना) हे कार्यालयीन कामकाजासाठी बाहेर गेले असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी मा.प्रथम

अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परवाना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर दि.१७/०३/२०१८ रोजी आयोजित करण्यात आली आहे. तसेच सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (परवाना) व अपिलार्थी अर्जदार यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.परवाना/२३६/२०१८ दि.०८/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (परवाना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.०६/०२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला अपुर्ण, दिशाभुल करणारी व चुकीची तसेच असमाधानकारक माहिती दिलेली आहे.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना सुधारित माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: <u>निर्णय</u> :-

१) जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (परवाना) यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती दिलेली असुन पुनश्च: उपलब्ध अभिलेख्यानुसार सुधारित माहिती मुद्देनिहाय १० दिवसांत विनाशुल्क देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (परवाना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.राजु दामोदर शेवंते,
१०१, शेवंते निवास, गोडदेव गाव,
पो.खारीगाव, भाईंदर (पूर्व),
ता.जि.ठाणे ४०११०५.

२) जन माहिती अधिकारी तथा
सहा.आयुक्त (परवाना).

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (परवाना) यांचे कार्यालय.